Impact Factor 4.574

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Journal

VOL-V ISSUE-VII July 2018

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

सहकार्यात्मक अध्ययन (Co-operating Learning) आणि सहकारशील अध्ययन (Collaborative Learning) यांचा तुलनात्मक अभ्यास

डॉ.बी.पी.मरजे
प्राचार्य
श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज
ऑफ एज्युकेशन,सांगली

श्रीमती वंदना एकनाथ लावंड
पीएच. डी. विद्यार्थिनी
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

सारांश

सहकार्यात्मक अध्ययन आणि सहकारशील अध्ययन या ज्ञानरचनावादाच्या अध्ययन पद्धती आहेत. सहकार्य व सहकारशीलता हे दोन शब्द परस्परांसाठी सारखेच वापरले जातात. मात्र हे दोन्ही शब्द गटामध्ये वेगळा अर्थ प्रदर्शित करतात. प्रत्येक पद्धतीला स्वतःची गतीशीलता व संरचना असते. त्यामुळे गटाला वेगवेगळे आकार प्राप्त होत असतात.

प्रस्तावना :

सहकारशील अध्ययन आणि सहकार्यात्मक अध्ययन या दोन्ही ज्ञानरचनावादाच्या अध्ययन-अध्यापन पद्धती आहेत. सहकार्य व सहकारशीलता हे दोन शब्द नेहमी परस्परांसाठी सारखेच वापरले जातात. परंतु हे दोन्ही शब्द गटामध्ये वेगळा अर्थ प्रदर्शित करतात. प्रत्येक पद्धतीला स्वतःची गतीशीलता व संरचना असते. त्यामुळे गटाला वेगवेगळे आकार प्राप्त होत असतात.

सहकारशीलतेमध्ये प्रत्येक व्यक्ती एकाच ध्येयासाठी एकत्रित काम करते तर सहकार्यात्मकमध्ये व्यक्ती स्वतःचा स्वार्थीपणा विचारात घेवून एकत्रित काम करते. उदा. ऑर्केस्ट्रा. ऑर्केस्ट्रामधील प्रत्येक संगीत वादक त्याचे वाद्य चांगले वाजवतो, ते सर्व वादक ऑर्केस्ट्रा चांगला सादर व्हावा म्हणून प्रयत्नशील असतात. मोठे ध्येय साध्य करण्यासाठी ऑर्केस्ट्रामधील फक्त ड्रमसर्कलचा, दोन वाद्यांचा विचार केला तर त्यामध्ये परस्पर सहकार्य दिसून येते. संपूर्ण ऑर्केस्ट्रा हा सहकारशीलता प्रदर्शित करतो तर त्यातील ड्रमसर्कल अथवा दोन वाद्य हे सहकार्य प्रदर्शित करते.

सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन यातील साम्य :

१) सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन या दोन्हीमध्ये शिक्षक हा सुलभकाचे काम करतो. अध्ययन सुविध देऊन विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ करतो.

२) सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन यामध्ये सक्रिय, कृतियुक्त अध्ययनावर जास्त भर दिलेला असतो. विद्यार्थी स्वतः समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करतो.

३) सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन यामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक हे दोघेही अध्ययन-अध्यापनाच्या अनुभवात सहभागी होतात.

४) सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन यामध्ये उच्च बौद्धिक कौशल्यात वाढ होते. नवीन अनुभवाचा अर्थ लावण्यासाठी जुने अनुभव आठवून विचार करण्यासाठी मेंदूला संघटित रचना तयार करावी लागते.

५) सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययनात विद्यार्थी स्वतः स्वतःच्या अध्ययनासाठी जबाबदार असतो. विद्यार्थी स्वतःच्या प्रयत्नातून पूर्वज्ञानाशी नवे अनुभव जोडून नव्या रचना करतो. त्यातील अपुरेपणा एकमेकांशी चर्चा करून, शिक्षकांशी चर्चा करून आत्मविश्वासाने अध्ययन करतो.

६) सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन या दोन्हींमध्ये विद्यार्थी लहान गटामध्ये त्यांच्या कल्पना, विचार मांडतात. गटातील सदस्यांसमोर आपले विचार मोकळेपणाने मांडतात. गट सदस्यांमध्ये संघभावना वाढीस लागते.

७) सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि माहिती याची धारणा विकसित करण्यास मदत करते. गटामध्ये दुसऱ्याचे विचार ऐकणे, दुसऱ्याच्या मताचा आदर करणे या सवयी लागतात. विचारांची देवाण-घेवाण होण्यामुळे ज्ञानधारणा अधिक चांगली होत असते.

८) सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन यामध्ये विद्यार्थ्यांचे बहुजिनसी गट तयार करावे लागतात. विविध क्षमता, अभिरूची, हुशार, सामान्य बुद्धीमत्ता, वय, लिंग या सर्वांचा विचार करून गट तयार केले जातात.

सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन यातील फरक :

अ. क्र.	सहकार्यात्मक अध्ययन	अ. क्र.	सहकारशील अध्ययन
१	सहकार्यात्मक अध्ययन ही अध्यापनाची यशस्वी कार्यनीती आहे की ज्यामध्ये लहान गटात विविध स्तरावरील विविध क्षमतेचे विद्यार्थी विविध अध्ययन कृतीतून विषयाचे ज्ञान समजावून घेतात.	१	सहकारशील अध्ययन ही अशी कल्पना आहे की अध्ययन ही नैसर्गिक सामाजिक कृती आहे, ज्यामध्ये सहभागी विद्यार्थी एकमेकांशी बोलतात, संभाषण करतात.
२	प्रत्येक व्यक्ती कार्याच्या प्रत्येक भागासाठी जबाबदार असतो.	२	सर्व सहभागी सदस्य समस्या सोडविण्यासाठी एकत्र काम करतात.
३	गटातील प्रत्येक सदस्य हा अध्ययन व प्राविण्याच्या वातावरण निर्मितीस जबाबदार असतो.	३	गटातील सर्व सदस्यांच्या संभाषणातील सामाजिक वातावरणात अध्ययन घडते.

४	बहुतेक वेळा शिक्षकांना समस्या व समस्येची उकल माहित असते आणि विद्यार्थी त्या दिशेने काम करतात.	४	बहुतेक वेळा शिक्षकांना समस्येची उकल माहिती नसते, ते संशोधक म्हणून संशोधन करतात.
५	विद्यार्थी लहान गटातून सामाजिक कौशल्य आत्मसात करतात. सामाजिक कौशल्याचे प्रशिक्षण लहान गटातून मिळते.	५	विद्यार्थ्यांमध्ये मूळातच सामाजिक कौशल्य आहेत हा विश्वास असतो. विद्यार्थी ध्येय प्राप्तीसाठी असलेल्या कौशल्याची बांधणी करतो.
६	प्रत्येक विद्यार्थ्यांची कृतीतील, उपक्रमातील विशेष भूमिका ठरलेली असते.	६	विद्यार्थी त्यांच्या कृतींची एकमेकात चर्चा करून संघटन करतात.
७	शिक्षक निरीक्षक, श्रवणकर्ता असतो. गरज वाटल्यास गटात हस्तक्षेप करतात.	७	शिक्षकाने कृतीवर, उपक्रमावर लक्ष ठेवण्याची गरज नसते. मात्र आवश्यक तेथे मार्गदर्शन करतात.
८	विद्यार्थी स्वतःचे काम मूल्यमापनासाठी जमा करतात.	८	विद्यार्थी तयार केलेली कृती पुढील कामासाठी स्वतःकडे ठेवतात.

सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन यांची आकृतीद्वारे सादरीकरण :

अ. क्र.	शीर्षक	सहकार्यात्मक अध्ययन	सहकारशील अध्ययन
१	ध्येय	उपध्येये असतात. उद्दिष्टांत विविधता असते. मर्यादित जबाबदाऱ्या असतात.	समान ध्येय असते. समान उद्दिष्टे असतात. सामाजिक जबाबदारी असते.
२	कार्य	बंदिस्त स्वाध्याय. भाकित प्रक्रिया. स्थिरता असते.	मुक्त स्वाध्याय. अभाकित प्रक्रिया. बदलणरी प्रक्रिया.
३	उत्पादित	उत्पादन. माहितीचे उत्पादन.	विकास. नविन उत्पादन.
४	संघातील नाती, नातेसंबंध	विविध संदर्भासाठी, कामासाठी परस्पर सामंजस्यातून स्वतंत्र काम केले जाते.	सामान्य ध्येयासाठी परस्पर सामंजस्यातून संघटितपणे काम. ध्येय प्राप्ती केली जाते.



समारोप :

सहकार्यात्मक अध्ययन आणि सहकारशील अध्ययन या ज्ञानरचनावादाच्या अध्ययन पद्धती आहेत. दोन्हीमध्ये विद्यार्थ्यांच्या कृतीयुक्त अध्ययन व विचार प्रक्रियेचा समावेश होतो. सहकार्यात्मक व सहकारशील अध्ययन हे एकसारखे वाटत असले तरी त्यांची ध्येये, काम करण्याची पद्धती, शिक्षक व विद्यार्थ्यांची जबाबदारी यात फरक आहे. विद्यार्थ्यांची ज्ञानरचनानिर्मिती अधिक चांगली होण्यासाठी शिक्षकांना सहकार्यात्मक अध्ययन व सहकारशील अध्ययन यातील साम्य व फरक माहिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षक ज्ञानरचनानिर्मितीसाठी अधिक योग्य सुविधा विद्यार्थ्यांना पुरवू शकतात.

संदर्भ :

1. चव्हाण गणेश. (२००९). अध्ययन-अध्यापन : पारंपारिक ते आधुनिक, पुणे : नित्य नूतन प्रकाशन.
2. बाम राजश्री, कोल्हटकर शील. (संपादक). (२०१४). मैत्री ज्ञानसंरचनावादाशी, पुणे : निराली प्रकाशन.
3. Kaushal Kishore. (2012). Co-operative Learning, New Delhi : APH Publishing Corporatiion.
4. Reforming Education Through Constructivism : (2012) . Pune : P. G. Department of Education and S. N. D. T. College of Education for Women.
5. https://www.cte.cornell.edu
6. www.thirteen.org>coopcollab